**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited "A" Grade

स्थापना वर्ष १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

**Ph.D. Section**

**विद्यावाचस्पती विभाग**

| PH.D. Office :- (0240) 2403122 | WEB SITE : www.bamu.ac.in | : http://bamua.digitaluniversity.ac | E-mail : phdsection@bamu.ac.in |
|---|---|---|---|

## परिपत्रक

**संदर्भ :- १) यू.जी.सी २००९ व २०१६ च्या मार्गदर्शक सूचना.**
**२) पीएच.डी अध्यादेश १००९.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद, अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१ दरम्यान झालेली पेट परिक्षा उत्तीर्ण होऊन आचार्य पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व संशोधक विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्याच्या आचार्य पदवी प्रवेशापासून सर्व प्रक्रिया संगणकीकृत करण्यात आली असून पुढील प्रक्रिया सुध्दा ऑनलाईन पध्दतीनेच होणार आहे. त्यामुळे प्रगती अहवाल सादर करतांना सुध्दा सर्व संशोधक विदयार्थ्यांनी विदयापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांमधूनच ऑनलाईन अहवाल व अहवालाचे शूल्क भरावे. प्रत्येक सहा महिन्यानंतर अहवाल भरणे अनिवार्य आहे. (माहे जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर) ऑफलाईन पध्दतीने कुणीही कोणताही प्रगती अहवाल किंवा त्यांचे शूल्क जमा करु नये, याची आचार्य पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व संशोधक विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी ही विनंती.

प्रगती अहवाल ऑनलाईन पध्दतीने भरतांना वापरावयाची पध्दत.

१. पीएच.डी पोर्टलवर लॉग-ईन करुन प्रगती अहवाल शूल्क रु. ७५ भरल्यानंतर ऑनलाईन प्रगती अहवाल नमुना उपलब्ध होईल.
२. प्रगती अहवालाच्या नमुन्यातील सर्व माहिती ऑनलाईन भरल्यानंतर प्रगती अहवालासाठी निश्चित करण्यात आलेले शूल्क सुध्दा ऑनलाईन भरणे अनिवार्य राहिल.
३. प्रगती अहवाल व शूल्क पूर्ण भरुन झाल्यानंतर अहवालाची प्रींट काढावी प्रींट काढलेल्या अहवालावर संशोधक मार्गदर्शकांची व संशोधन केंद्र प्रमुखांची स्वाक्षरी घेऊन सदर अहवाल स्कॅन करुन पुन्हा पीएच.डी पोर्टलवर आपआपल्या लॉग-ईन मधून अपलोड करावे.

उपरोक्त पध्दत शैक्षणिक वर्ष २०२१ पूर्वी आचार्य पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या संशोधक विदयार्थ्यांसाठी सुध्दा लागू करावयाची असल्याने सदर विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांचे लॉग-ईन ID व PRN Genrate करण्यासाठी त्यांनी आचार्य पदवी प्रवेशासाठी मिळालेल्या Provisional Letter च्या प्रतीवर आपला भ्रमणध्वनी लिहून Provisional Letter ची प्रत petcell@bamu.ac.in या ई-मेलवर पाठवावी नविन विदयार्थ्यांचे लॉग-ईन ID तयार झाल्यानंतर त्यांना सुध्दा प्रगती अहवाल सादर करण्यासाठी उपरोक्त नमूद अ. क्र. १ ते ३ मधील सूचनांचे पालन करणे अनिवार्य राहिल. विहित मुदतीतील अहवाल एका महिन्यानंतर सादर केल्यास रु.२००/- विलंब शुल्क भरावा लागेल याची सुध्दा नोंद घ्यावी.

करिता माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

उपकुलसचिव
विद्यावाचस्पती विभाग

प्रत:

१. मा. अधिष्ठाता, सर्व विदयाशाखा, प्रस्तुत विदयापीठ.
२. मा. प्राचार्य सर्व संलग्नित महविदयालये, प्रस्तुत विदयापीठ.
३. मा. विभाग प्रमुख व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विदयापीठ.
४. जन संपर्क अधिकारी, प्रस्तुत विदयापीठ.
५. संचालक युनिक, प्रस्तुत विदयापीठ.

विद्यापीठ परिसर; ][
औरंगाबाद - ४३१ ००४ ][
संदर्भ. क्र. पीएच.डी./२०२२-२३/12458-63. ][
दिनांक : ०३-०८-२०२२ ][

उपकुलसचिव
विद्यावाचस्पती विभाग